महाराष्ट्र राज्य हज समितीस सुधारित अंदाज २०१८-१९ च्या मर्यादेत उर्वरित निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः हज-२०१८/प्र.क्र.१६९/का-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:२९.०३.२०१९

वाचा:-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः - अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/४/२०१८.

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः - पूरक-२०१८/प्र.क्र.९५/अर्थ-३, दि.२७ जुलै, २०१८.

३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः -अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५/०१/२०१९.

प्रस्तावना: -

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्र. झेड ई-१, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१८), यात्रेकरुंचा खर्च (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२३५ ए २६७)" लेखाशीर्षाखाली रु.१०७.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता, तसेच खादिमुल हुज्जाजवर झालेला खर्च भागविण्यासाठी रु.७१.२८ लक्ष इतका निधी पुरवणी मागणी द्वारे प्राप्त झाला होता. महाराष्ट्र राज्य हज समितीस एकूण निधीच्या)अर्थसंकल्पीत तरतूद(पुरक मागणी + ७०% च्या मर्यादेत रु.१२४.७९ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे. सन २०१८-१९ च्या सुधारित अंदाजानुसार उक्त लेखाशीर्षाखाली रु.१६०.४५ लक्ष इतका निधी उपलब्ध झाला असून त्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य हज समितीस अनिवार्य खर्च भागविण्यासाठी उर्वरित रु. ३५.६६ लक्ष निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

सन २०१८-१९ च्या सुधारित अंदाजानुसार "मागणी क्र. झेड ई-१, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१८), यात्रेकरुंचा खर्च (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२३५ ए २६७)" या लेखाशीर्षाखाली सुधारित अंदाजानुसार उपलब्ध झालेल्या रु.१६०.४५ लक्ष इतक्या निधीतून महाराष्ट्र राज्य हज समितीस खालीलप्रमाणे उर्वरित रु.३५.६६ लक्ष इतका निधी वितरित करण्यात येत आहे:-

लेखाशिर्ष	अर्थसंकल्पीत तरतूद + पुरक मागणी	एप्रिल ते डिसेंबर,२०१८ या कालावधीसाठी ७०% च्या मर्यादेत वितरित निधी+ पुरक मागणीच्या ७० % वितरित निधी	सुधारित अंदाज २०१८-१९ (अर्थसंकल्पीत तरतूद + पुरक मागणी)	सुधारित अंदाज २०१८-१९ च्या मर्यादेत उर्वरित निधी वितरण
१	२	३	४	५
मागणी क्र. झेड ई-१, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१८), यात्रेकरुंचा खर्च (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२३५ ए २६७)	रु.१७८.२८ लक्ष	रु. १२४.७९ लक्ष	रु.१६०.४५ लक्ष	रु.३५.६६ लक्ष (रु.१६०.४५ लक्ष-रु.१२४.७९ लक्ष)

२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/४/२०१८ अनुसार या पूर्वी वितरित केलेल्या अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे महाराष्ट्र राज्य हज समितीकडून प्राप्त झाली आहेत.

३. वितरित करण्यात आलेल्या तरतूदी एवढा आपला खर्च मर्यादित ठेवणेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने आवश्यक ती दक्षता घ्यावी. हे आदेश प्रशासकीय विभागांना वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८ व दि.२५/०१/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१८१५४५४०८०१४ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Mahesh Sadashiv Choukekar
Date: 2019.03.29 14:35:54 +05'30'

(म. स. चौकेकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, रु.क्र.६ व ७, तळमजला, साबू सिद्दिकी,मुसाफिरखाना, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.

प्रति,

१. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर,

महाराष्ट्र राज्य.

२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

३. अवर सचिव (व्यव-४/अर्थ-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

४.अवर सचिव (का-७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

५. निवडनस्ती (का-५)